(IO)

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): अहिल्यानगर **P.S.**(ठाणे): सुपा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0352 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):18/09/2025 04:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार
**Time Period** (कालावधी): पहर 6
**Date From** (दिनांक पासून): 17/09/2025
**Date To** ( दिनांक पर्यंत): 17/09/2025
**Time From** (वेळेपासून): 16:36 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:50 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 18/09/2025 **Time** (वेळ): 03:55 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 005

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 18/09/2025 03:55 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 15 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): वाडेगव्हाण, तलाठी ऑफिसचे समोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भानुदास पावसु चोरमले
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेती व मेंढिपालन, राकुरूंद,ता, पारनेर जि अहिल्यानगर ,सुपा, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेती व मेंढिपालन, राकुरूंद,ता, पारनेर जि अहिल्यानगर ,सुपा,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9075309234

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपक भिमाजी साठे | | | 1. हंगा,तापारनेर,जिअहिल्यानगर, सुपा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद शासकिय विश्रामगृह,सुपा,ता.पारनेर दि. 18/09/2025.

मी भानुदास पावसु चोरमले, वय-45वर्षे, व्यवसाय- शेती व मेंढिपालन, रा.कुरूंद,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर,मो.नं. 9075309234.

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाषी असुन मी दि.17/09/2025 रोजी 10/15 पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना फोन करून मला एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला वाडेगव्हाण,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांना संपर्क करून मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणाबाबत माहिती दिली व त्यानंतर 12/30 वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर चे अधिकारी व कर्मचारी हे वाडेगव्हाण येथे मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि श्री.आल्हाट यांनी माझा तसेच माझे सोबत हजर असलेला माझा मुलगा जगन चोरमले यांचा परिचय करुन घेतला तसेच आम्हाला त्यांचा व त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन शासकीय पंचाचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन दोन षासकिय पंचासमक्ष तक्रार सांगितली की, " माझा मुलगा जगन भानुदास चोरमले,सख्खा भाऊ बबन चोरमले,व सख्खा पुतण्या बंडा दौलत चोरमले या तिघांनी मिळुन माझे चुलत भाऊ गोजीराम बिरा चोरमले यांच्या मालकिची मौजे कुरूंद येथील गट नं.96 मधील 60 गुंठे जमीन खरेदीदस्ता द्वारे दिनांक 10/10/2023 रोजी खरेदी केली होती.सदर खरेदी दस्ताचा दस्त नं.7099/2023 असा आहे.माझ्या मुलाच्या आणि पुतण्यांच्या नावाने खरेदी केलेल्या शेतजमीनीवर गोजीराम बिरा चोरमले यांचे गोरेष्वर ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचे कर्ज होते व सदर कर्ज गोजीराम बिरा चोरमले यांनी आमचेसोबत खेरदीखत होण्यापुर्वी भरलेले होते.परंतु कर्जाची परतफेड केलेबाबत गोजीराम बिरा चोरमले व गोरष्वर ग्रामीण बिगरषेती पतसंस्था यांचेमध्ये रिकनव्हेन्स डिड झालेले नसल्याने सदर कर्जाचा सात बारा उता-यावरील बोजा उतरवलेला नव्हता व गोजीराम बिरा चोरमले यांचेवरील कर्जाचा बोजा सातबा-यावर इतर हक्कात दिसत असल्याने माझे मुलाचे, भावाचे तसेच पुतण्याच्या नावाची नोंद जमीनीच्या सातबा-यावर लावण्याकरीता अडचण येत होती.त्यामुळे गोजीराम बिरा चोरमले व गोरेष्वर ग्रामीण बिगरशेती पतसंस्था यांचेमध्ये गोजीराम चोरमले यांनी कर्जाची परतफेड केलेबाबत दिनांक 26/08/2025 रोजी रिकनव्हेंस डिड करण्यात आलेली होती व सदरची रिकनव्हेंस डिडची दुय्यम निबंधक कार्यालय,पारनेर येथे दिनांक 02/09/2025 रोजी नोंदणी केल्यानंतर सदरची रिकनव्हेंस डिडची मुळ प्रत गोजीराम चोरमले यांनी तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण येथे देण्याकरीता मला दिली होती त्याप्रमाणे मी मुलगा जगन चोरमले, भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांचे नावाची नोंद सातबा-यावर होणेबाबतचा टंकलिखित अर्ज तसेच मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमले,पुतणे बंडा दौलत चोरमले, व गोजीराम बिरा चोरमले यांचेमध्ये गट नं. 96 मधील 60 गुंठे क्षेत्राचे दिनांक 10/10/2023 रोजी झालेल्या खरेदीदस्त क्रमांक 7099/2023 ची सुची क्रमांक 2 ची मुळ प्रत व दिनांक 02/09/2025 रोजी गोजीराम चोरमले व गोरेष्वर ग्रामीण बिगरशेती पतसंस्था यांचेमधील कर्जाची परतफेड केलेबाबतची रजिस्टर रिकनव्हेंस डिडची मुळ प्रत व सुची क्र.2 अषी कागदपत्र घेवुन मी दिनांक 09/09/2025 रोजी वाडेगव्हाण येथील तलाठी कार्यालयात जावुन कुरूंद गावचे तलाठी साठे भाऊसाहेब यांची भेट घेतली व त्यांना माझेकडील सर्व कागदपत्रे दिली व त्यांना मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांचे नावाची नोंद सातबा-यावर लावण्याकरीता खरेदीखताचा व रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन कार्यवाही करण्याची विनंती केली त्यावेळी त्यांनी मला सांगितले कि,आमच्या कुरूंद गावाचा चार्ज पहिला माझेकडे होता आता तो तलाठी शिंगाडे मॅडम यांचेकडे असल्याचे सांगितले व त्या नवीन असल्याने त्यांचेकडे ऑनलाईन फेरफार घेण्यासाठी डिजीटल सहि नसल्याचे

सांगुन कुरूंद गावातील फेरफार माझ्याचं डिजीटल सहिने ऑनलाईन घेत असल्याचे त्यांनी मला सांगितले आणि त्यानंतर त्यांनी माझेकडे खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांचे नावाची नोंद सात बारा उता-यावर लावण्याची कार्यवाही करण्याकरीता 10,000/- रूपयांची मागणी केली. खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन साताबा-या उता-यावर मुलगा जगन भानुदास चोरमले भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांच्या नावाची नोंद लावण्याच्या कार्यवाहीसाठी कोणतीहि शासकिय फि ची आवष्यकता नाही हे मला माहिती होते त्यामुळे माझ्या लक्षात आले कि,तलाठी साठे भाऊसाहेब हे माझ्याकडे खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन माझे मुलाचे,भावाचे व पुतण्याच्या नावाची नोंद सात बारा उता-यावर लावण्याच्या कार्यवाहिसाठी 10,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहे.त्यावेळी मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगुन माझ्याकडील अर्ज व कागदपत्रे मी तलाठी साठे भाऊसाहेब यांचेकडे दिलेबाबत माझेकडील अर्जाच्या स्थळप्रतीवर पोहोच देण्याकरीता त्यांना विनंती केली असता त्यांनी मला पोहोच दिली नाही. त्यानंतर मी तलाठी कार्यालयातुन निघुन आलो त्यानंतर आजपावेतो तलाठी साठे भाऊसाहेब यांनी खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन माझा मुलगा,भाऊ व पुतण्याच्या नावाची नोंद सात बारा उता-यावर लावण्याची कार्यवाही केलेली नाही. आज रोजी मी तलाठी कार्यालय, वाडेगव्हाण येथे जावुन तलाठी साठे भाऊसाहेब यांची भेट घेणार आहे त्यावेळी त्यांनी माझेकडे खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन सात बारा उता-यावर मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमल व पुतणे बंडा दौलत चोरमले यांच्या नावाची नोंद लावण्याच्या कार्यवाहीकरीता लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी.." वगैरे मजकुरची तक्रार सांगितली. माझे षिक्षण झालेले नाही त्यामुळे मी सांगितलेली तक्रार पोनि श्री.आल्हाट यांचे सोबत असलेले पोशि किशोर कुलधर यांनी लिहीली व सदरची तक्रार पोनि श्री. आल्हाट यांनी मला वाचुन दाखवली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर मी डाव्या हाताचे अंगठयाचा ठसा उमटवला व त्यानंतर,दोन्ही पंचांनी व पोनि श्री.आल्हाट यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन लोकसेवक साठे,तलाठी यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.पोनि श्री. आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला व पंचांना माहिती समजावून सांगितली.पोनि श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला,पंच नं.1 तसेच मुलगा जगन चोरमले यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर पोनि श्री.आल्हाट यांनी मला लोकसेवक साठे,तलाठी हे कोठे भेटतील? याबाबत विचारणा केली असता मी लोकसेवक साठे,तलाठी हे तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण येथे भेटतील असे सांगितले त्याप्रमाणे लोकसेवक साठे यांची तलाठी कार्यालय, वाडेगव्हाण या ठिकाणी भेट घेण्याचे ठरले त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे गळयात कोणास दिसणार नाही अशाप्रकारे अडकवुन दिला.पोनि श्री.आल्हाट यांचे सुचने प्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह माझेकडील दुचाकी वाहनाने व मुलगा जगन चोरमले त्याचेकडील दुचाकी वाहनाने लोकसेवक साठे,तलाठी यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण येथे 13/32 वा.चे सुमारास रवाना झालो.

मी, पंच नं. 1 व मुलगा जगन चोरमले असे तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण येथे जावुन लोकसेवक साठे,तलाठी यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना नोंदीच बघा ना असे बोललो त्यावेळी ते मला म्हणाले कि,त्या दिवशी बोललो, आणुन दया, त्यावेळी मी त्यांना म्हणालो,काय मला सांगा त्यावेळी लोकसेवक साठे,तलाठी हे मला म्हणाले परत परत काय बोलायचं त्यावेळी मी त्यांना म्हणालो तुम्ही किती म्हणता? त्यावेळी ते मला म्हणाले मी दहा म्हंटलो ना तुम्हाला,तुम्ही कायतरी आठ हजार म्हंटले होते,देवुन टाका आठ हजार,देतो करून आज त्यावेळी मी त्यांना म्हणालो किती दयावं लागनं त्यावेळी ते म्हणाले आठ हजार देवुन टाका,सगळ करून घेवु,दोन-तीन नोंदी आहेत त्यावर मी त्यांना म्हणालो नांेद आता व्यवस्थित होईल ना त्यावर ते म्हणाले सगळ करून देतो त्यावेळी मी त्यांना म्हणालो नोंद पक्की होईल ना. त्यावेळी ते म्हणाले पक्की होईल,तुम्हाला सात बारा सगळ देतो..घेवुन या लगेच त्यावर मी त्यांना तुम्ही किती वाजेपर्यंत आहे असे विचारले असता त्यांनी पाच वाजेपर्यंत असल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना अध्र्या तासामध्ये आले तर चालेल ना.असे म्हणालो असता ते म्हणाले या या तुमची बोजाची नोंद,बाकीच्या सगळ्या नोंदी क्लिअर करून देतो असे म्हणाले.लोकसेवक साठे,तलाठी त्यांनी माझेकडे खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांचे नावाची नोंद सात बारा उता-यावर लावण्याची कार्यवाही करण्याकरीता 8,000/- रूपयांची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्षवली. त्यानतर मी पंच नं.1 यांचेसह सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 15/22 वा. चे सुमारास परत आलो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यानंतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले असता लोकसेवक साठे,तलाठी यांनी माझेकडे खेरदीखताचा तसेच रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन मुलगा जगन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमले व पुतणे बंडा दौलत चोरमले यांचे नावाची नोंद सात बारा उता-यावर लावण्याची कार्यवाही करण्याकरीता 8,000/- रूपयांची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोकसेवक साठे,तलाठी यांना लाच म्हणुन 8,000/-रुपये रक्कम देण्याचे सर्वानुमते ठरले.लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 8,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 16 भारतीय चलनी नोटा, अषी रक्कम हजर केली.पोनि श्री.आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकॉ वाघ यांनी करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदरचा कागद पंच नं.2 यांचे ताब्यात दिला. अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम लोकसेवक साठे,तलाठी यांना देण्याकरीता माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला,दोन्ही पंचांस व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री. आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले व लोकसेवक साठे,तलाठी यांनी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी कार्यालयामध्ये येण्याअगोदर त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करण्यास सांगितला होता त्याप्रमाणे पोनि श्री.आल्हाट यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी 9075309234 या माझ्या मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक साठे यांच्या 8888841357 या मोबाईल क्रमांकावर 16/30 वा.चे सुमारास फोन करून विचारणा केली असता त्यांनी वाडेगव्हाण येथे असल्याचे सांगितले सदरच्या कॉल मधील संभाशण पोनि श्री.आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करून घेतले त्यानंतर तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर व्हाईस रेकॉडर चालु करून माझ्या गळयात अडकवला.त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या दुचाकी वाहनावरून 16.36 वा.रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच नं.1 असे तलाठी कार्यालयाचे जवळ जावुन थांबलो.सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री झाली.त्यावेळी मी व पंच नं.01 असे तलाठी कार्यालयाचे ठिकाणी गेलो असता कार्यालय बंद होते त्यावेळी मी लोकसेवक साठे,तलाठी यांच्या वरील क्रमांकावर फोन करून ऑफीसला आल्याचे सांगितले असता त्यांनी तलाठी कार्यालयात येत असल्याचे सांगुन फोन बंद केला त्यानंतर काहि वेळाने लोकसेवक साठे, तलाठी दुचाकी वाहनाने तलाठी कार्यालयाचे समोर आले त्यावेळी त्यांचे सोबत भेट झाल्यानंतर ते लाईट नाही नाहितर लगेच फेर टाकुन दिला असता असे म्हणाले त्यावर मी त्यांना किती दयायचे तुम्हाला, असे म्हणालो असता ते म्हणाले झाल ना,बोलनं आता आता काय परतं त्यावेळी मी त्यावेळी मी शर्टच्या डाव्या खिषामधील 8000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक साठे यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरली व मोजुन घेण्यास सांगितली असता लोकसेवक साठे यांनी सदरची लाच रक्कम 8000/- रूपये त्यांचे उजवे हाताने स्वीकारुन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली त्यावेळी मी सापळा पथकास लोकसेवक साठे यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजत इशारा केला. ती वेळ 16.50 वा. दरम्यानची होती. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व लोकसेवक साठे यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले.व त्यावेळी त्यांना ताब्यात घेवुन पंच नं.02 करवी लोकसेवक साठे यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत केली.

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक साठे,तलाठी यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दिपक भिमाजी साठे,वय-36 वर्शे,ग्राममहसुल अधिकारी, (तलाठी)सजा-वाडेगव्हाण,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर,रा. हंगा,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक साठे,तलाठी यांचेकडुन तलाठी कार्यालयाचे कुलुपाच्या चाव्या घेवुन कार्यालय उघडे करून सदर कार्यालयामध्ये आवष्यक त्या तपासण्या कल्या व मी लोकसेवक साठे यांना दिलेली कागदपत्रे लोकसेवक साठे,तलाठी यांचे टेबलवरील ट्रेमध्ये मिळुन आली सदरची कागदपत्रे पोनि श्री.आल्हाट यांनी ताब्यात घेवुन त्याच्या छायांकित प्रती काढुन त्यावर पोनि श्री.आल्हाट, दोन्ही पंचांनी व लोकसेवक साठे यांनी सहि करून पोनि श्री.आल्हाट यांनी सदरची कागदपत्रे ताब्यात घेतली. त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी शासकिय विश्रामगृह,सुपा येथे येण्यास सांगितले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक साठे यांना घेवुन शासकिय विश्रामगृह,सुपा येथे आले व मला दिलेल्या सुचनाप्रमाणे मी माझ्या वाहनाने षासकिय विश्रामगृह,सुपा येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि.17/09/2025 रोजी 13/32 वा. ते 15/22 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक दिपक भिमाजी साठे, वय-36 वर्शे,ग्राममहसुल अधिकारी, (तलाठी) सजा-वाडेगव्हाण, ता.पारनेर, जि.

अहिल्यानगर,रा.हंगा,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर यांनी माझा मुलगा जग्गन भानुदास चोरमले,सख्खा भाऊ बबन चोरमले,व सख्खा पुतण्या बंडा दौलत चोरमले व चुलत भाऊ गोजीराम बिरा चोरमले यांच्या मधील मौजे कुरूंद येथील गट नं.96 मधील 60 गुंठे जमीन खरेदीदस्ताचा व गोजीराम चोरमले व गोरेश्वर ग्रामीण बिगरषेती पतसंस्था यांचेमधील कर्जाची परतफेड केलेबाबतची रजिस्टर रिकनव्हेंस डिडचा फेरफार घेवुन सात बारा उता-यावर मुलगा जग्गन भानुदास चोरमले,भाऊ बबन पावसु चोरमल व पुतणे बंडा दौलत चोरमले यांच्या नावाची नोंद लावण्याच्या कार्यवाहीकरीता पंचासमक्ष 8000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकाण्याचे मान्य केले व सापळा कारवाई दरम्यान 16/36 ते 16/50 वा दरम्यान तलाठी कार्यालय,वाडेगव्हाण कार्यालयाचे समोर सदरील लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक दिपक भिमाजी साठे,वय-36 वर्शे,ग्राममहसुल अधिकारी, (तलाठी) सजा-वाडेगव्हाण यांचेविरूध्द माझी कायदेषीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखित केलेली असुन मला लिहिता व वाचता येत नसल्याने मला ती मला वाचुन दाखविली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हे लिहून दिले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

jyoti chandrakant gadkari(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

नि.डा.अं.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** jyoti chandrakant ga
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**